# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/६७८७ /२०१८ पुणे शहर दिनांक ३० /०७/२०१८

पुणे शहरातील हडपसर वाहतुक विभागाचे हद्दीत भाजी मंडई (मंत्रीमार्केट) ते गंगा रेसिडन्सी या रस्त्यावरील आर. सी. सी. कमान जुनी व नादुरुस्त झाल्याने सदर कमान पाडण्याचे काम करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, सदर ठिकाणी कमान पाडण्याचे काम करत असताना मंत्री मार्केट कडुन ससाणेनगरकडे जाणारा रस्ता वाहतुकीसाठी पूर्ण पणे बंद करण्यात येणार आहे.

सदरचे काम हे दि. ३१/०७/२०१८ रोजी स.११.०० ते दि. ०१/०८/२०१८ रात्रौ.२३.०० वा. पर्यंत करण्यात येणार असून सदर ठिकाणी वाहतुक कोंडी होवु नये व वाहतुक सुरळित चालण्यासाठी खालील मार्गाने वाहतूक डायव्हर्शन करण्यात येत आहे.

१. मंत्रीमार्केट कडुन ससाणेनगरकडे जाणा-या वाहनांनी हडपसरवेस येथुन उजवीकडे वळुन ससाणेनगर या मार्गाचा वापर करावा.

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.